महाराष्ट्र शासन
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.
email :- excisebo@vsnl.net / excisebo@yahoo.com / seasdbu@indiatimes.com
Tel.No:- Jt.Commr: 2620238, Dy.Commr: 2665569, FAX No. 2662370

वाचले- या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक एफएलआर १०९५/एलअेबी/५-ब, दिनांक १.१.१९९६

विषय :- विदेशी मद्याच्या बाटल्यांवर / पॅकींगवर बारकोड छापण्याबाबत.

## परिपत्रक

क्रमांक : एमआयएसी ११०७/४१२७५/५-ब                    मुंबई, २८ जून, २००७

या कार्यालयाच्या परिपत्रक क्रमांक एफएलआर १०९५/एलअेबी/५-ब, दिनांक १.१.१९९६ अन्वये भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या बाटलीवर लावण्यात येणाऱ्या लेबलवर कोणता मजकूर छापणे आवश्यक आहे या संदर्भात सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये विदेशी मद्य उत्पादकांनी लेबलवर बारकोड छापणे आवश्यक असल्याबाबत कोणत्याही सूचना निर्गमित करण्यात आल्या नव्हत्या. तरी देखील काही मद्य उत्पादक त्यांच्या ब्रँडच्या लेबलवर बारकोडचा वापर करीत आहेत. परंतु सर्वच मद्य उत्पादक बारकोडचा वापर करत नाही. मात्र आता वाणिज्य मंत्रालय, केंद्र शासन, दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशानुसार भारतात निर्मिती होणाऱ्या विदेशी मद्याच्या लेबलवर जीआयएस प्रमाणकानुसार बारकोड छापणे आवश्यक आहे.

विदेशी मद्याच्या बाटलीवरील लेबलवर बारकोडचा वापर केल्यास त्या मद्याची बाजारातील किंमत ग्राहकांना समजते व सहजासहजी अशी किंमत एखाद्या व्यक्तीस पुसून टाकता येत नाही. तसेच अवैधरीत्या बाजारात आलेल्या व गैरमार्गाने विक्री होणाऱ्या मद्यास आळा बसू शकेल. सदरबाब विचारात घेवून तसेच उपरोक्त केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील सर्व विदेशी मद्य उत्पादकांनी ही बारकोडचा वापर करणे आवश्यक आहे.

दि महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट ॲन्ड मॅन्युफॅक्चर ऑफ पोटेबल लिकर रुल्स, १९६६ मधील नियम २४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार राज्यातील सर्व विदेशी मद्य उत्पादकांना

कळविण्यात येते की, त्यांच्या निर्माणीत उत्पादीत होणाऱ्या विदेशी मद्याच्या बाटल्यांवरील लेबलांवर या पुढे बारकोड छापणे आवश्यक राहील.

(रमानाथ झा)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
२. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
३. सर्व विदेशी मद्य उत्पादक व त्यावरील प्रभारी अधिकारी
४. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
५. अभिलेख शाखा ५ प्रती